मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि.२७/०७/२०२६

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**क्रीडा विभाग**

**दहीहंडी उत्सवानिमित्त गोविंदा पथकांना विमा संरक्षण देणे संदर्भात महानगरपालिका मुख्यालयात बैठकीचे आयोजन**

दिनांक ०५ सप्टेंबर २०२६ रोजी दहिहंडी उत्सव (गोपाळकाला) साजरा होत असुन दहिहंडी उत्सवात भाग घेणारे गोविंदा पथके मानवी मनोरे उभारून आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न या उत्सवाच्या वेळी करित असतात. या उत्सवामधील जोखीम व धोका विचारात घेवून वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील गोविंदांना अपघात विमा संरक्षण देणे महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका, क्रीडा विभागामार्फत *मंगळवार दि.२८/०७/२०२६* रोजी *दुपारी ०४.३०* वाजता मा.महापौर श्री.अजीव पाटील यांचे अध्यक्षतेखाली *मा. सर्वसाधारण सभागृह, वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, चौथा मजला, यशवंत नगर, विरार (पश्चिम)* येथे गोविंदा पथक, दहिहंडी उत्सव आयोजक, स्थानिक पोलिस विभाग, वाहतुक विभाग, महावितरण विभाग, अग्निशमन विभाग व इतर अन्य विभागासमवेत संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी या बैठकीस संबंधीत प्रतिनिधी यांनी उपस्थित राहावे अशी विनंती व आवाहन महानगरपालीकेतर्फे करण्यात येत आहे.

क्रीडा विभाग,
वसई विरार शहर महानगरपालिका